Golden Research Thoughts
Vol -2 , ISSUE –12, June.2013
ISSN:- 2231-5063

Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

मराठे - मोगल संघर्षातील रामसेज किल्ल्याची हकीकत

राजेंद्र नागनाथ गायकवाड

(इतिहास विभाग प्रमुख),

विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालय, टेंभूर्णी ता. माढा, जि. सोलापूर.

सारांश :

स्वराज्य उभारणी करत असताना छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ल्यांना अनन्यसाधारण महत्त्व दिले होते. किल्ले म्हणजे राज्याचा आत्मा, किल्ल्याच्या साहाय्याने एक शिपाई शेकडो सैन्याचा मुकाबला करू शकतो हा शिवरायांचा विचार होता. त्यामुळे शिवरायांनी आपल्या कारकीर्दीत अनेक नवीन किल्ल्यांची बांधणी केली, जुन्या किल्ल्यांची डागडूजी केली, शत्रूपक्षाकडील असंख्य किल्ले स्वराज्यात दाखल करून घेतले. शिवकाळात डोंगरी किल्ले, भूईकोट किल्ले आणि जलदूर्ग हे प्रामुख्याने किल्ल्यांचे प्रकार होते. डोंगरी किल्ले आणि जलदूर्ग यांना नैसर्गिकरित्या संरक्षण कवच प्राप्त झाले होते. परंतू भूईकोट किल्लांच्या संरक्षणासाठी पूर्णपणे कृत्रिम व्यवस्थेवर आधारित राहावे लागत होते. शिवकाळात या तिन्ही प्रकारच्या किल्ल्यांनी स्वराज्याला भरभराट प्राप्त करून दिली होती. यामुळेच शिवरायांना 'किल्ल्यांचा राजा' म्हटले जात होते. शिवरायांच्या प्रभावी किल्ला प्रशासनाने, सततच्या किल्ल्यावरील रपेटीने, कडक शिस्तीने मराठयांचे किल्ले अजिंक्य बनले होते. शिवरायांच्या पश्चात 'शिवपुत्र' संभाजी राजांनीही हाच शिरस्ता कायम ठेवला होता. किल्ल्याच्या साहाय्यानेच स्वराज्याचे संरक्षण, संवर्धन, विस्तार साध्य करता येईल यावर संभाजी राजांचाही विश्वास होता. म्हणूनच संभाजी राजांनीही आपल्या काळात किल्ल्याला प्रशासनाचा केंद्रबिंदू मानले.

प्रस्तावना

शिवरायांच्या हयातीत औरंगजेब बादशहा कधीही दक्षिणेच्या मोहिमेवर आला नाही. त्याने आपले सरदार शिवरायांच्या पारिपत्यासाठी पाठविले होते. मात्र शिवरायांच्या मृत्यूच्या वार्तेने औरंगजेबाच्या दक्षिणेतील साम्राज्यविस्ताराच्या महत्त्वाकांक्षेला फुंकर घातली. त्यातच औरंगजेबाचा मुलगा अकबर याने रजपूतांच्या साहाय्याने आपल्या पित्याविरूद्ध बंडखोरी केली. औरंगजेबासारख्या कपटनीतीत पारंगत असणाऱ्या बादशहाला अकबर-रजपूत यांच्या तील आघाडीला संपूष्टात आणण्यास वेळ लागला नाही. एकाकी पडलेला अकबर आश्रय घेण्यासाठी दक्षिणेला संभाजी राजांकडे आला. शहाजादा अकबर याला संभाजी राजांनी आश्रय दिला हे पाहून औरंगजेबाला आपल्यावर फार मोठे संकट आले आहे. याची जाणीव झाली.[१] कारण औरंगजेबाला मराठी सत्तेची ताकद माहित होती. शिवाय छत्रपती संभाजी राजांच्या सामर्थ्याचीही वार्ता औरंगजेबाच्या कानी होती. म्हणून आपल्या मनातील महत्त्वाकांक्षा आणि राजपूत्राचे बंड मोडून काढणे, या दूहेरी उद्देशाने औरंगजेबाने दख्खनवर स्वत:च चालून जाण्याचे ठरविले. तो अफाट फौजफाटयासह दक्षिणेच्या मोहिमेवर अजमेरहून निघाला (८ सप्टेंबर १६८१).[२]

शिवरायांच्या मृत्यूच्या वेळीही मराठे-मोगल यांच्यात संघर्ष चालूच होता. यात औरंगजेब स्वत: दख्खनमध्ये उतरल्याने अधिकच भर पडली. औरंगजेब आपल्या प्रचंड सेनासागर, मोठा खजिना, बरेचसे नातेवाईक यांचा प्रचंड लवाजमा घेवून स्वराज्यावर घसरला होता. १३ नोव्हेंबर १६८१ रोजी तो नर्मदा काठावरील बुऱ्हाणपूरला पोहोचला. बुऱ्हाणपूर हे मोगलांसाठी दख्खनचे प्रवेशद्वार होते. व्यापारी मार्गावरील महत्त्वाचे शहर होते. ज्याची बऱ्याचदा मराठयांनी लयलूट केली होती. अकबराच्या बंडखोरीच्या पार्श्वभूमीवर दिल्लीच्या मार्गावरील नाशिक ते ठाणे परिसरातील सर्व किल्ले आणि ठाणी आपल्या ताब्यात हवीत अशी औरंगजेबाची इच्छा होती.[३]

दख्खनच्या मोहिमेचा शुभारंभ रामसेज किल्ल्यापासून करण्याचा बादशहा औरंगजबाचा विचार होता. कारण पूर्वी औरंगजेब राजपुत्र अवस्थेमध्ये दख्खनच्या सुभेदारीवर असताना रामसेज जिंकूनच त्याने दख्खनमध्ये प्रवेश केला होता. सबब आपल्या पूर्वाश्रमीच्या विजयाची पुनर्रावृत्ती करण्याचा औरंगजेबाचा इरादा होता. यासाठीच त्याने रामसेज किल्ल्याला आपले लक्ष्य बनविण्याचे ठरविले.

रामसेज हा किल्ला नाशिक जिल्हयातील दिंडोरी तालुक्यात, दिंडोरीच्या दक्षिणेला चार मैलावर आहे. याची समुद्रसपाटीपासूनची उंची साधारणत: सव्वा तीन हजार फूट तर जमीनीपासूनची उंची जेमतेम दीड हजार फूट आहे. किल्ल्यात प्रवेश करण्यासाठी एक जोड प्रवेशद्वार आहे. यातच एक चोरवाट आहे. रामसेजपासून ७ कोसांवर त्र्यंबकगड किल्ला आहे. सपाटीवरील या किल्ल्याला मराठयांकडून काही मदत होईल असे वाटत नव्हते. स्वराज्याच्या उत्तरेकडील सीमेवरील हा किल्ला जिंकणे सहज शक्य आहे. शिवाय मराठयांची किल्ल्यातील शिबंदीही ६०० पेक्षा जास्त नव्हती. ही सर्व माहिती घेवून बादशहाने ३५-४० हजार सैन्य, प्रचंड दारूगोळा, तोफखाना घेवून शहाबुद्दीन फिरोजजंगला रामसेजवर चाल करून जाण्याची आज्ञा केली. त्याच्यासोबत पीरगुलाम, कासीमखान, महंमद खलील, शुभकर्ण बुंदेला, राव दल्पत बुंदेला, रामसिंह बुंदेला इत्यादी मातब्बर सरदार दिलेले होते. शके १६०४ च्या चैत्रात (मार्च-एप्रिल १६८२) शहाबुद्दीनखानाने रामसेज वेढला.[४]

या वेळी रामसेजचा मराठा किल्लेदार कोण होता याविषयी इतिहासात मततांतरे आहेत. डॉ. कमल गोखले, डॉ. जयसिंगराव पवार याविषयीची माहिती देत नाहीत. परंतू तो चांगलाच अनुभवी आणि कसलेला होता. या विषयी दूमत नाही. किल्ल्यावर शिबंदी कमी असताना, दारूगोळा, तोफखाना याची कमतरता असताना किल्ला दीर्घ काळ लढविण्याचे कौशल्य केवळ अनुभवी किल्लेदाराकडेच असू शकते. तोफा नसतानाही काठडीचा वापर करून लाकडी तोफा त्याने बनवल्या. या काठडी तोफा चांगल्या दहा दहा तोफांचे काम करण्यास समर्थ होत्या.

शहाबुद्दीनखानाच्या पराक्रमाचे वर्णन करताना खाफीखान लिहितो की, ''किल्ल्याला वेढा घालणे, सुरुंग लावणे, मोर्चे बांधणे, दमदमे तयार करून वर चढविणे इत्यादि सर्व गोष्टी शहाबुद्दीनखानाने केल्या.''[५] शहाबुद्दीनखान रामसेज काबीज करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करीत होता. त्याने रामसेजच्या समोर एक प्रचंड मोठा लाकडी दमदमा उभा केला. त्यासाठी किल्ल्याच्या आसपासच्या प्रदेशातून हजारो कामगाराकरवी लाकूडफाटा गोळा केला. त्या दमदम्यावर एका वेळी ५०० बंदूकची उभे राहून किल्ल्यावर गोळयांचा मारा करू शकतील एवढा तो विशाल होता. मराठयांनी शहाबुद्दीनखानाला अतिशय कडवा प्रतिकार केल्याने शहाबुद्दीनखानाला विजय मिळण्याची शाश्वती वाटेनासी झाली.

रामसेजच्या संघर्षावर स्वत: छत्रपती संभाजी महाराज आणि सेनापती हंबीरराव मोहिते यांचे लक्ष होते. मोगलांच्या प्रचंड सेनासागराला बाहेरून खिंडार पाडून किल्ल्यात रसद पाठविणे, मोगलांचा वेढा मोडून काढणे अशा उद्देशाने राजांनी रूपाजी भोसले व मानाजी मोरे यांना ५-७ हजारांची फौज देवून शहाबुद्दीनवर धाडले. झालेल्या अटीतटीच्या संघर्षात शहाबुद्दीनखान पराभूत झाला. मराठयांचा आत्मविश्वास दुणावला. खाफीखान लिहितो की, ''नंतर बादशहाने शहाबुद्दीनखानाला परत बोलावले आणि त्याच्या जागी खानजहान बहाद्दूर कोकल्ताश यास किल्ला घेण्यासाठी पाठविले.''[६]

शहाबुद्दीनखानाने औरंगजेबाचा अपेक्षाभंग केला. मराठयांचे किल्ले चुटकीसरशी चिंकण्याची बादशहाची स्वप्ने हवेत विरू लागली होती. मराठयांचा श्वास म्हणजे किल्ले असे असताना, श्वास रोखण्यास टपलेल्या शत्रूला मराठे सहजासहजी शरण जाणारे नव्हते. हेच आता सिद्ध होऊ लागले होते.

बहाद्दूरखानाने वेढयाची सूत्रे हाती घेतली. किल्ला युक्तीनेच काबीज करावा लागेल. याची त्याला पुरती जाणीव झाली होती. त्यासाठी त्याने एक नामी योजना आखली होती. त्यानुसार आपण किल्ल्याच्या एका बाजूला हल्ला करण्याची हूल उठवायची आणि प्रत्यक्षात मात्र दूसऱ्याच बाजूने निवडक सैन्याच्या साहाय्याने दोरखंडाचा आधार घेवून किल्ल्यात प्रवेश मिळवून किल्ल्याचे दरवाजे उघडून मोगल सैन्याला किल्ल्यात घेणे. अशी एकंदर ती योजना होती. बहाद्दूरखानाची ही योजना मराठयांच्या किल्लेदारापर्यंत पोहाचली. त्याने बहाद्दूरखानाला प्रत्युत्तर देण्याची तयारी चालवली. मोगल ज्या बाजूने किल्ल्यावर हल्ला करण्याची हूल उठवणार होते. त्या बाजूला मराठयांनी त्यांच्यावर मोठ मोठे दगड, पेटते पलिते, तेलात भिजलेले पेटते कपडयांचे बोळे तटावरून फेकण्यास सुरूवात केली. मोगल हैराण झाले. लढाई ऐन भरात आली होती. परंतू ही लुटूपुटूची लढाई होती कारण बहाद्दूरखानाला याच्या आडून दूसऱ्याबाजूने गडावर स्वार पाठवावयाचे होते. दुसऱ्या बाजूने बहाद्दूरखानाचे निवडक १५०-२०० सैनिक किल्ल्याच्या तटाला दोरखंड लावून वर चढण्याचा प्रयत्न करू लागली होती. दोन मोगली सैनिक वर चढण्यात यशस्वी झाले. त्यांनी दोरखंड फेकून इतरांना वर आणण्याची मोहिम हाती घेतली. मराठे हे सर्व पाहत तेथेच दबा धरून बसले होते. त्यांनी लगेचच त्यांना अडथळा आणला नाही. त्यामुळे शत्रूला आपली योजना सफल झाल्यासारखे वाटले. मोगलांचे १५०-२०० सैनिक मुंगळयाप्रमाणे दोरखंडाला चिकटून वर चढत होते. एवढयात मराठा वीरांनी दोरखंड धरून उभे राहिलेल्या मोगली सैनिकांच्या गर्दनी छाटल्या. ते दरीत कोसळले. सोबत तटावर चढू पाहणारे मोगली सैनिकही दरीत कासळले. बहाद्दूरखानाची योजना त्याच्याच अंगलट आली. मराठयांचा उत्साह, जोम वाढला. बहाद्दूरखान मात्र चिंताग्रस्त झाला. वरून औरंगजेबाचा रामसेज घेण्याविषयीचा दबाव त्याच्यावर होता. सर्व उपाय करून थकल्यावर जसा माणूस हतबल होतो तशी बहाद्दूरखानाची अवस्था झाली. यावेळी भूताच्या काल्पनिक गोष्टीचा आधार घेण्याची वेळ या सरदारावर आली. एका मोतद्दाराची त्याची भेट झाली. त्याने बहाद्दूरखानाला सांगितले की, ''भुते वश करण्याची कामात मी पटाईत आहे. शंभर तोळे वजनाचा एक सोन्याचा साप तयार करा. तो माझ्या हाती द्या आणि हल्ल्याच्या वेळी मला आघाडीवर ठेवा. मी भुताच्या मदतीने किल्ल्याच्या प्रवेशद्वारापर्यंत कोणतीही अडचण न येता जाऊ शकेन अशी मला आशा आहे.''[७]

बहाद्दूरखानाला शेवटी भूताच्या काल्पनिकतेचा आधार घेवून रामसेज जिंकून घ्यावा याचा मोह व्हावा यातच रामसेजच्या संघर्षाचे रहस्य दडले आहे. मराठयांच्या पराक्रमापुढे अशा मोतद्दाराचा निभाव लागला नाही. मराठयांच्या तोफेच्या एका धडाक्यानेच त्याला आडवे पडावे लागले. बहाद्दूरखान पुन्हा सपशेल अपयशी ठरला. औरंगजेबाला ही वार्ता जाताच त्याने तात्काळ त्याची बदली करून टाकली. त्याच्या जागी कासीमखान किरमाणी याची नियुक्ती करण्यात आली. बादशचा प्रचंड खजिना, प्रचंड दारूगोळा साथीला असताना सुद्धा दोन मातब्बर सरदारांना किल्ला काबीज करता आला नाही याचे बादशहाला आश्चर्य वाटले. बहाद्दूरखानाने रामसेज पुढून माघार घेत असताना शहाबुद्दीनखानाने उभारलेला प्रचंड दमदमा पेटवून दिला. मराठयांनी गडावरून बहाद्दूरखानाकडे हातवारे करून बोंबाबोंब करून होळी साजरी केली. संभाजी राजांना किल्लेदाराच्या पराक्रमाची वार्ता कळली. संभाजी राजांनी ''रामसेजच्या किल्लेदाराकडे खिलतीचा पोषाख, रत्नजडित कडे आणि नगद रक्कम पाठवून त्याचा गौरव केला.''[८] रामसेजच्या किल्लेदाराचा पराक्रम मोठा होता. किल्लेदार कोण होता. नामदेवराव जाधव यांच्या मते त्या किल्लेदाराचे नाव 'सूर्याजी जेधे' होते.[९] संभाजी महाराजांनी किल्लेदाराचा गौरव करून त्याला स्वराज्याच्या प्रमुख किल्ल्याच्या किल्लेदारपदी नियुक्त केले.

रामसेज घेण्याच्या कामी सतत येणाऱ्या अपयशाच्या वार्तेने औरंगजेब संतापत होता. अशातच त्याने आपल्या डोक्यावरील पगडी जमीनीवर फेकून देवून प्रतिज्ञा केली की, ''जोवर या काफरबच्चास पकडणार नाही वा ठार मारणार नाही तोवर पुन्हा ही पगडी डोक्यावर ठेवणार नाही.''[१०] दिल्लीपती औरंगजेब संभाजी राजांवर एवढा चिडला होता की, त्याची पुढील कारकीर्द उघडया, बोडक्या डोक्याने त्याला घालवावी लागली होती. औरंगजेब बादशहाच्या या अगतिकतेतून रामसेज किल्ल्याच्या अभेद्यतेचे दर्शन घडते. रामसेज घेण्यासाठी पुढे मोगलांना ४-५ वर्षे वाट पाहावी लागली. एवढया चिवटपणे खचितच एखादा किल्ला लढला. शेवटी औरंगजेबाच्या कुटनीतीने, लाचलुचपतीने हा किल्ला मोगलांच्या ताब्यात गेला. खाफीखान लिहितो की, ''रामसेजवर दूसरा किल्लेदार आला. रामसेज भागात, अब्दूल करीम नावाचा एक जमीनदार होता. त्याच्या मार्फतीने मुल्हेरचा किल्लेदार नेकनामखान याने रामसेजच्या नवीन किल्लेदाराला वश करून घेतले आणि अशा रीतीने किल्ला मोगलांच्या ताब्यात आला (इ. स. १६८७).''[११] मोगलांना झुलवणाऱ्या रामसेजबाबत ईश्वरदास नागर लिहितो की, ''परमेश्वराच्या कृपेने आणि बादशहाच्या भाग्याने रामसेजचा किल्ला मोगलांच्या ताब्यात आला आहे.''[१२] रामसेज मोगलांनी फंदफितूरीने मिळवला. मराठा स्वातंत्र्ययुद्धाच्या पार्श्वभूमीवर बादशहाला दख्खनच्या मोहिमेच्या प्रारंभीच मिळालेली सलामी अभूतपूर्व ठरते.

निष्कर्ष :

मराठा स्वातंत्र्ययुद्धाचा दुसरा टप्पा छत्रपती संभाजी महाराजांच्या कारकीर्दीने सुरू होतो. छत्रपती शिवरायांची शिकवण अद्यापपावेतो कोणीही विसरले नव्हते. छत्रपती संभाजी राजांनी आपल्या पित्याचेचे धोरण पुढे चालविले होते. स्वराज्यातील सर्व गडकोट, प्रदेश यांच्या संरक्षणावर त्यांनी भर दिला होता. मोगल, पोर्तुगीज, इंग्रज, सिद्दी यासारख्या शत्रूंचा यशस्वी मुकाबला संभाजी राजांनी केला होता. औरंगजेबाच्या रूपाने स्वराज्यावर आलेल्या प्रलयकारी संकटालाही तेवढयाच ताकदीने सामोरे जाण्याचे धारिष्ट संभाजी राजांनी दाखविले. एकटा रामसेज मराठयांनी ४-५ वर्षे लढविला यातून मराठयांच्या वाढलेल्या लष्करी बळाची प्रचिती येते. रामसेजवरील सततच्या पराभवामुळे औरंगजेबाला आपल्या प्रसिद्ध सरदारांच्या सुद्धा सतत बदल्या कराव्या लागल्या होत्या. ही रामसेजच्या मोहिमेची विशेष बाब होती. औरंगजेबाला ईमानदारीने संघर्ष करून मराठयांना पराभूत करता आले नाही. त्याला सतत फंदफितूरीचाच आधार घ्यावा लागला. याला रामसेजचा लढा प्रबळ पुरावा होता. शेवटी छत्रपती संभाजी राजांच्या कल्पक, धाडसी नेतृत्वामुळे, कुशाग्र बुद्धीमत्तेमुळे, वेगवान लष्करी हालचाली व डावपेचामुळे मराठयांना रामसेज सारखा किल्ला अभेद्य आणि अजिंक्य करता आला. हीच स्थिती संभाजी राजांच्या कारकीर्दीत स्वराज्याच्या सर्व गडकोटांबाबत टिकून राहिली.

संदर्भ :

१. डॉ. कमल गोखले, शिवपुत्र संभाजी, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, २००१, पृ; २१५.
२. डॉ. जयसिंगराव पवार, छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ, रिया प्रकाशन, कोल्हापूर, २००९, पृ; ५६.
३. नामदेवराव जाधव, गनिमी कावा, राजमाता प्रकाशन, मुंबई, २०१०, पृ; ४५५.
४. डॉ. पवार, तत्रैव, पृ; ५३.
५. सेतूमाधवराव पवार, मराठयांचे स्वातंत्र्ययुद्ध, जोशी, लोखंडे प्रकाशन, पुणे, १९६२, पृ; ९.
६. पगडी, तत्रैव, पृ; ९.
७. पगडी, तत्रैव, पृ; १०.
८. पगडी, तत्रैव, पृ; ११.
९. जाधव, तत्रैव, पृ; ४५६.
१०. डॉ. पवार, तत्रैव, पृ; ५६.
११. पगडी, तत्रैव, पृ; ११.
१२. संपा. सेतूमाधवराव पगडी, मोगल आणि मराठे, ठोकळ प्रकाशन, पुणे, १९६३, पृ; २३.